# प्रेस नोट

दिनांक : १७/०८/२०२६

## पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ - ०२, मुंबई

### पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई

### नोकराकडे विश्वासाने सोपविलेल्या रोख रक्कमेचा अपहार केल्याप्रकरणी गुन्हेगारास अटक करून मालमत्ता/रोख रक्कम हस्तगत केल्याबाबत

दिनांक ०८/०८/२०२६ रोजी आरोपी पीरसिंग देवडा यास फिर्यादी यांनी त्यांच्या दुसऱ्या ऑफिसमधून रोख रक्कम रु. १,२०,००,०००/- आणण्यास सुचित केले होते. त्याप्रमाणे फिर्यादींच्या दुसऱ्या ऑफिसमधून नमूद रक्कम असलेल्या दोन बॅगा फिर्यादी यांना देण्याकरीता आरोपी पीरसिंग देवडा याच्याकडे विश्वासाने सोपविण्यात आल्या होत्या. नमूद आरोपीने त्या पैशांच्या बॅगा बदलून व त्यामध्ये कागदी पुठ्ठे भरून त्या फिर्यादींना दिल्या व नमूद रक्कमेचा अपहार केल्याची घटना घडली होती. सदर प्रकरणी दिनांक १०/०८/२०२६ रोजी पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ८७२/२०२६, कलम ३१६(४) भा.न्या.सं २०२३ नोंद करण्यात आला.

या गुन्हयामध्ये तांत्रिक बाबी, सी.सी.टी.व्ही. फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे प्रथम घटनास्थळी व त्यानंतर अहमदाबाद येथे जावून तपास पथकाने तपास केला. या तपासामध्ये पाहिजे आरोपी पीरसिंग देवडा याने त्याचा सख्खा भाऊ युवराज सिंग देवडा, वय २४ वर्षे, रा.ठि. मु.पो. मामावली, तालूका व जिल्हा सिरोही, राजस्थान राज्य याचेसह या गुन्हयाचा कट रचून संगनमताने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

नमूद पोलीस पथकाने यासंदर्भात सातत्यपुर्ण व कसोशीने तपास करून दिनांक १४/०८/२०२६ रोजी नमूद आरोपीतांच्या मुळ गावी राजस्थान येथे जावून आरोपी युवराज सिंग देवडा यास शिताफीने अटक केली व त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून गुन्हयातील रु. १,२०,००,०००/- अपहारित रक्कमेपैकी एकूण रु. १,१६,५०,०००/- इतकी रक्कम जप्त केली. अटक आरोपी व त्याचेकडून गुन्हयातील हस्तगत केलेल्या मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| अटक आरोपी | हस्तगत मालमत्ता |
|---|---|
| युवराज सिंग वसंत सिंग देवरा, वय २४ वर्षे, रा.ठि - मु.पो. मामावली, ता.जि. सिरोही, राज्य - राजस्थान | रोख रक्कम रु. १,१६,५०,०००/- |

या गुन्हयातील पाहिजे आरोपी पीरसिंग वसंत सिंग देवरा, वय ३० वर्षे याचा शोध घेण्यात येत आहे.गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

वरील कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मनोजकुमार शर्मा (कायदा व सुव्यवस्था), मा. अपर पोलीस आयुक्त श्री. शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर. (दक्षिण परिमंडळ-२) तसेच मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती रेणुका बुवा, (पायधुनी विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. लक्ष्मीकांत साळुंखे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अजय कदम, तपासी अधिकारी स. पो.नि. सचिन लहामगे, स.पो.नि. किरण मांढरे, पो.उ.नि. कल्पेश चव्हाण, पो.उ.नि. दिपक ठोंबरे, परि. पो.उ.नि. आकाश तेल्कापल्लीवार तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.ह. दिपक निकम, पो.ह. सुनिल ठाकूर, पो.शि. लिंबाजी इथापे तसेच पो. ह. प्रमोद पवार आणि पो.शि. गणेश जगदेव यांनी उत्कृष्ट तपास करून यशस्वीरीत्या पार पाडली आहे.